# वसई विरार शहर महानगरपालिका

**मा. स्थायी समिती सभा दिनांक १८ /०९/२०१७**

**दु ११.३० वा.**

| अ.क्र. | विषयाचे नाव | स्थायी समिती सभेचा निर्णय |
|---|---|---|
| १. | मागील मा. स्थायी समिती सभा दि. २१/०८/२०१७ व दि.०४/०९/२०१७ रोजीचे इतिवृत्त कायम करणे | ठराव :- स्थायी समिती सभा दि. १८/०३/२०१७ रोजीचे इतिवृत्त दुरुस्तीसह कायम करणेंत येत आहे.<br><br>**वअनुमोदक :- मा.श्री. वैभव पाटील  सूचक :- मा.श्री. सुदेश चौधरी**<br>**ठराव सर्वानुमते मंजूर.** |
| २. | वसई विरार शहर महानगरपालिकेच्या विधि विभागाच्या कामकाजासाठी नवीन सॉफ्टवेअर तयार करणेबाबत. | ठराव :- वरील विषयावर सभागृहात सविस्तर चर्चा करण्यांत आली. त्यानुसार प्रस्तावात नमुद कामासाठी रक्कम रु. २,५३,०००/- दतक्या अंदाजित खर्चास तसेच दरपत्रके मागवून एजन्सी निश्चित करुन सॉफ्टवेअर बनविण्यास आजची सभा सर्वानुमते मंजुरी देतआहे.<br><br>**अनुमोदक :- मा.श्री. अजीत नाईक     सूचक :- मा.श्री. महेश पाटील**<br>**ठराव सर्वानुमते मंजूर.** |
| ३. | वसई विरार शहर महानगरपालिकामध्ये सदयस्थितीत असलेल्या संगणक,प्रिंटर व इतर संगणकीय साहित्यांच्या देखभाल दुरुस्तीसाठी ई-निविदा प्रक्रियेद्वारे दर निश्चित करणे बाबत. | ठराव :- सदरबाबत सभागृहात सविस्तर चर्चा करण्यांत आली. सादर केलेल्या प्रस्तावात प्राप्त झालेल्या पात्र निविदांचा तुलनात्मक तक्ता न देता फक्त कमी दराची निविदाकाराचे दर सादर केलेले आहेत. सबब सदर प्रस्ताव अपुर्ण स्वरुपाचा असल्याने तो अद्यावत स्वरुपात मा.स्थायी समितीस सादर करावा. तोपर्यंत सदरचा विषय आजची मा.स्थायी समिती सभा तहकुब ठेवत आहे. यास सभेने एकमताने मंजूरी दिली. |

| | | |
|---|---|---|
| | | अनुमोदक :- मा.श्री. किशोर नाना पाटील सूचक :- मा.श्री. महेश पाटील<br>ठराव सर्वानुमते मंजूर |
| ४. | वसई विरार शहर महानगरपालिका क्षेत्रामध्ये दि.२१/०८/२०१७ ते दि.२७/०८/२०१७ व दि.२८/०८/२०१७ ते दि.०३/०९/२०१७ या कालावधीत लागलेल्या आगी व झालेल्या दुर्घटनांचे प्रतिवृत्त मा.स्थायी समितीचे माहितीसाठी. | ठराव :- सदरबाबत सभागृहात साधक-बाधक चर्चा करण्यांत आली. प्रस्तावातील माहिती व सभागृहातील चर्चा मा.स्थायी समिती सभेत अवलोकन केली व त्यानुसार संबंधितांने नोंद घेवून कार्यवाही करणेस सभेन एकमताने मंजूरी दिली.<br>अनुमोदक :- मा.श्रीम. सुषमा लोपीस सूचक :- मा.श्री. कन्हैया भोईर<br>ठराव सर्वानुमते मंजूर. |

नगरसचिव

वसई- विरार शहर महानगरपालिका